स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार संघांची पुनर्रचना

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र
क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.१७/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २४ ऑक्टोबर, २००५.

## आ दे श

राज्य निवडणूक आयोगाकडे अशा तक्रारी प्राप्त होतात की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार संघांच्या (महानगरपालिका, नगर परिषदा/नगर पंचायती, ग्रामपंचायती यांचे प्रभाग, जिल्हा परिषदांचे मतदार गट व पंचायत समित्यांचे मतदार गण) पुनर्रचनेच्या कामात राजकीय पुढा-यांचा हस्तक्षेप होतो. तरी असा हस्तक्षेप टाळण्यासाठी व प्रभाग रचना राजकीय प्रभावाखाली होऊ नये यासाठी मतदार संघांच्या पुनर्रचनेचे काम प्रारंभिक म्हणजे प्रारुप मतदार संघ तयार करण्याचे काम गोपनीय स्वरुपात हाताळण्यात यावे. कोणत्याही राजकीय पक्षाने अथवा पुढा-याने अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सदस्याने त्याबाबतची माहिती मागितल्यास ती देण्यात येऊ नये. अशा सूचना सर्व मतदार संघांच्या पुनर्रचनेच्या कामकाजाशी संबंधित असणा-या अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात याव्यात. अशी माहिती मिळाल्यास राजकीय पुढा-यांकडून किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांकडून मतदार संघांची पुनर्रचना कशी करावी यासंबंधी सूचना देण्यात येतात व त्या सूचनांचे काही वेळा पालनही होते. मतदार संघाच्या रचनेवर ब-याचदा आरक्षण अवलंबून असते विशेषत: अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींचे. कोणत्याही अधिका-याने/कर्मचा-याने अशी माहिती दिल्यास त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई त्वरीत सुरु करण्यात यावी. प्रारुप मतदार संघ ज्यावेळी जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रसिध्द करण्यात येतात त्यावेळी सर्व संबंधितांना प्रस्तावाची माहिती होतेच.

२. माहितीच्या अधिकाराखाली कोणत्याही नागरिकाने प्रभाग रचनेची माहि मागितल्यास अशी माहिती देण्यात येऊ नये. कारण माहितीचा अधिकार अशा बाबींना लागू हो की, ज्यात निर्णय झाला आहे.

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी